RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : १०१

दि. १३ ऑगस्ट २०२६, वार : गुरूवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990


# लोकनेते विलासराव देशमुख यांच्या स्मृतिदिना निमित्त महाआरोग्य शिबिराचे आयोजन

## २०० पेक्षा अधिक हॉस्पिटल्स, २००० पेक्षा अधिक डॉक्टरांचा सहभाग: गरजू रुग्णांची मोफत तपासणी, उपचार व शस्त्रक्रिया

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री, लातूरचे सुपुत्र लोकनेते विलासराव देशमुख यांच्या १४ व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना आरोग्यसेवेतून आदरांजली अर्पण करण्यासाठी आयएमए, लातूर, इंडियन डेंटल असोसिएशन, होमिओपॅथी असोसिएशन, निमा आणि विलासराव देशमुख फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ऑगस्ट रोजी १४ आणि रोजी लातूर शहर व जिल्ह्यातील विविध रुग्णालये आणि डॉक्टरांच्या वतीने २०० पेक्षा अधिक रुग्णालयामध्ये महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये रुग्णांची मोफत तपासणी आवश्यकतेनुसार उपचार, विशेष सवलतीच्या दरात काही तपासण्या व शस्त्रक्रियाही करण्यात येणार आहेत.

इंडियन मेडिकल असोसिएशन (खच-), इंडियन डेंटल असोसिएशन, होमिओपॅथी असोसिएशन, निमा (छखच-) आणि विलासराव देशमुख फाऊंडेशन यांच्या संयुक्त प्रसिद्धीस देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे. आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या स्मृतिदिनानिमित्त लातूर जिल्हा आणि महाराष्ट्रभर विविध सामाजिक उपक्रमातून त्यांच्या आठवणी आणि कार्याचा उजाळा दिला जातो. लोकसेवेचा वारसा आरोग्यसेवेतून पुढे चालवण्याची परंपरा लातूर येथील विविध आरोग्यसेवा संघटनांच्या वतीने चालवण्यात येत आहे. मागच्या १३ वर्षात कोविड महामारीचे सन २०२० वर्ष वगळता सातत्याने १२ वर्षे हे महाआरोग्य शिबिर घेण्यात आले आहे. दरवर्षी या शिबिरात सहभागी होणाऱ्या




रुग्णालयांची आणि डॉक्टरांची संख्या वाढत आहे.

या महाआरोग्य शिबिरामध्ये सन २०२४ मध्ये ६५ रुग्णालयांनी सहभाग घेतला होता. तर सन २०२५ मध्ये ७०, सन २०२६ मध्ये ८८, सन २०१७ मध्ये १०१, सन २०१८ मध्ये १४७, सन २०१९ मध्ये १५०, सन २०२२ मध्ये २००, सन २०२२ मध्ये ३१०, सन २०२३ मध्ये ३००, सन २०२४ मध्ये २००, सन २०२५ मध्ये २०४ घेतला. मात्र सन २०२० मध्ये कोविड-१९ महामारीमुळे शिबिर घेता आले नव्हते.

आणखीही सहभाग वाढतो आहे. उद्या पर्यंत या सहभागी रुग्णांची संख्या खूप मोठी होईल अशी अपेक्षा आहे. एकंदरीत रुग्णालयांची वाढती संख्या लक्षात घेता या आरोग्य शिबिरांत सहभागी होणाऱ्या ॲलोपॅथी, आयुर्वेद, होमिओपॅथी व दंत वैद्यकीय क्षेत्रातील नामवंत वरिष्ठ डॉक्टरांनी आणि तरुण तज्ज्ञ डॉक्टरांची संख्या १००० पेक्षा अधिक होल आहे. महाआरोग्य शिबिरात साथीचे रोग; हृदयरोग, कॅन्सर आदिसारख्या खर्चिक आजारांचीही तपासणी व उपचार करण्यात येणार आहेत.

या महाआरोग्य शिबिरात सहभागी झालेल्या सर्व रुग्णालयात १४ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता लोकनेते आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून शिबिराचा शुभारंभ होईल त्यानंतर रुग्णांची तपासणी व आवश्यकतेनुसार करण्यात येणार आहे.

लातूर मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, सचिव डॉ. विश्रांत भारती, डॉ. मनसूर भोसमे, डॉ. श्र्वेता पवार, डॉ. आकांक्षा त्रिपाठी, निमाचे अध्यक्ष डॉ. बालाजी साळुंके, विनोद कदम, डॉ. महेश सांडूर, होमिओपॅथीचे अध्यक्ष डॉ. अम्रपाली देशमुख, सचिव डॉ. अक्षयनी लाखवीदे, डॉ. पुरुषोत्तम दरक, डॉ. संजय गव्हाणे, डॉ. दिनेश नवगिरे, डॉ. राजेंद्र बाहेती मुरुड, दंतवैद्यकीयचे अध्यक्ष डॉ. संजयकुमार बिराजदार, सचिव डॉ. शैलेश पडगीलवार, खजिनदार डॉ. साफल्य कडतने आदी पदाधिकारी महाआरोग्य शिबिर यशस्वी करण्यासाठी समन्वयक भूमिका पार पाडत आहेत, परिश्रम घेत आहेत. डॉ. सोपान जटाळ, डॉ. अशोक पोतदार, डॉ. संदीप कणकवट, डॉ. अशोक आरदवाड, डॉ. कल्याण बरमदे, डॉ. हमीद चौधरी, डॉ. अनुजा कुलकर्णी यांच्यासह स्पेशल मंडळीचे या शिबिर आयोजनात मार्गदर्शन लाभत आहे.

**आरोग्य सेवेतून आदरांजली :अनोखा उपक्रम आमदार: अमित देशमुख**

आदरणीय लोकनेते विलासरावजी देशमुख साहेब यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना आरोग्यसेवेतून आदरांजली अर्पण करण्याचा ॲलोपॅथी, आयुर्वेद, होमिओपॅथी व दंत वैद्यकीय या संघटनांचा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून या संघटनांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महाआरोग्य शिबिराचा अधिकाधिक गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले आहे. लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रातील विविध आरोग्य संघटनांच्या वतीने दरवर्षी घेण्यात येणारा महाआरोग्य शिबिराचा उपक्रम आगळावेगळा ठरतो आहे. यातून लातूर व परिसरातील सर्वसामान्य परिस्थितीतील रुग्णांना दिलासा देण्याचे कार्य घडते आहे. या सर्व आरोग्य संघटनांचे आणि सहभागी डॉक्टरांचे लोकप्रतिनिधी या नात्याने मी मनस्वी आभार व्यक्त करीत असल्याचेही आमदार देशमुख यांनी म्हटले आहे.

**संपूर्ण जिल्ह्यात नेत्रचिकित्सा शिबिराचे आयोजन- खासदार डॉ. शिवाजी काळगे**

आयएमए व इतर आरोग्य संघटनांच्या आवाहनाला अनुसरून लातूर येथे माझ्या लक्ष्मी नेत्रालयासह जवळपास सर्वच नेत्ररुग्णालयात आरोग्य शिबिराचे आयोजन केले असून अहमदपूर येथील डॉ. रामेश्र्वर चामले, उदगीरचे येथे डॉ. तानाजी मोरे, निलंगा येथे डॉ. श्रीनिवास कुलकर्णी यांच्या रुग्णालयातही नेत्रतपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. शिवाजी काळगे यांनी म्हटले आहे. लातूर शहर व जिल्ह्यातील सर्वच पक्षांच्या वतीने आयोजित शिबिराचा जिल्ह्यातील गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी केले आहे.

आदरणीय लोकनेते विलासरावजी देशमुख साहेब यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना आरोग्यसेवेतून आदरांजली अर्पण करण्याचा ॲलोपॅथी, आयुर्वेद, होमिओपॅथी व दंत वैद्यकीय या संघटनांचा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून या संघटनांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महाआरोग्य शिबिराचा अधिकाधिक गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले आहे.

लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रातील विविध आरोग्य संघटनांच्या वतीने दरवर्षी घेण्यात येणारा महाआरोग्य शिबिराचा उपक्रम आगळावेगळा ठरतो आहे. यातून लातूर व परिसरातील सर्वसामान्य परिस्थितीतील रुग्णांना दिलासा देण्याचे कार्य घडते आहे. या सर्व आरोग्य संघटनांचे आणि सहभागी डॉक्टरांचे लोकप्रतिनिधी या नात्याने मी मनस्वी आभार व्यक्त करीत असल्याचेही आमदार देशमुख यांनी म्हटले आहे.

# अहमदपूर शहरात सीसीटीव्ही यंत्रणा तातडीने उभारावी

## प्रमुख चौक, बाजारपेठ, सार्वजनिक व संवेदनशील ठिकाणे सीसीटीव्हीच्या निगराणीखाली आणण्याची मागणी

**अहमदपूर/प्रतिनिधी :** अहमदपूर शहराची वाढती लोकसंख्या, वाढता वाहतूक वर्दळ तसेच बाजारपेठ आणि सार्वजनिक ठिकाणी निर्माण होणाऱ्या सुरक्षेच्या प्रश्नांचा विचार करता शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठ, बसस्थानक परिसर, शासकीय कार्यालये, शाळा-महाविद्यालय परिसर तसेच संवेदनशील ठिकाणी आधुनिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची यंत्रणा तातडीने उभारण्यात यावी, अशी आग्रही मागणी युवकनेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी व नगरसेविका तनुजाताई सूर्यवंशी यांनी एका निवेदना द्वारे केली आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी, लातूर आणि मुख्याधिकारी, नगर परिषद अहमदपूर यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात शहरातील प्रमुख चौक, मुख्य रस्ते, बाजारपेठ, बसस्थानक परिसर, शासकीय कार्यालये, शाळा-महाविद्यालय परिसर, सार्वजनिक तसेच संवेदनशील भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे. गुन्हेगारीला आळा घालण्यासोबतच वाहतूक नियमांचे उल्लंघन, तोडफोड, भांडणे, महिलांची छेडछाड व इतर गैरप्रकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा प्रभावी ठरू शकते. गुन्हा घडल्यानंतर पुरावे मिळविण्यापुरतीच नव्हे, तर गैरप्रकार करणाऱ्यांवर प्रतिबंधात्मक दबाव निर्माण करणारी ही महत्त्वाची सुरक्षा व्यवस्था असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**बैठक होऊनही निर्णय प्रलंबित:-**

या विषयासंदर्भात मागील वर्षभरापासून संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांसमवेत बैठक घेऊन प्रस्ताव तयार करण्याबाबत चर्चा झाली होती. तसेच पुढील पंधरा दिवसांत नगर परिषदेकडून प्रस्ताव सादर करून प्रशासकीय मान्यता मिळवून देण्याचे आश्र्वासन देण्यात आले होते. मात्र, अद्याप याबाबत ठोस कार्यवाही झालेली नसल्याने या प्रशासकीय दिरंगाईबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

निवेदनात पुढील प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.संपूर्ण अहमदपूर शहराचे सर्वेक्षण करून सीसीटीव्ही आवश्यक असलेल्या ठिकाणांची निश्र्चिती करावी.प्रमुख चौक, बाजारपेठ व संवेदनशील ठिकाणी तातडीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास मंजुरी द्यावी. बसविण्यात येणाऱ्या कॅमेऱ्यांचे २४ तास देखरेख व रेकॉर्डिंग सुनिश्र्चित करावे. वाहतूक नियंत्रणासाठी प्रमुख चौकांमध्ये उच्च क्षमतेचे कॅमेरे बसवावेत.सीसीटीव्ही यंत्रणेचे फुटेज सुरक्षित राहण्यासाठी योग्य सर्व्हर/संग्रहण व्यवस्था निर्माण करावी.पोलीस प्रशासनाच्या समन्वयाने एकात्मिक शहर सुरक्षा यंत्रणा उभारावी. आवश्यक निधी नगर परिषद स्तरावर उपलब्ध करून द्यावा अथवा शासनाच्या संबंधित योजनांतून निधी प्राप्त करण्यासाठी तातडीने प्रस्ताव सादर करावा तसेच प्रशासकीय मान्यता देवून काम सुरू करावे अशी मागणी केली आहे.

**सुरक्षित अहमदपूर – निर्भय अहमदपूर**

अहमदपूर शहरातील नागरिकांची सुरक्षितता ही प्रशासनाची सर्वोच्च प्राथमिकता असली पाहिजे. शहर सुरक्षित असेल तरच नागरिक निर्भयपणे जगू शकतील. त्यामुळे संपूर्ण अहमदपूर शहरात आवश्यक त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने मंजूर करून कार्यान्वित करावेत, अशी ठाम मागणी डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी आणि सौ. तनुजाताई सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी केली आहे. सुरक्षित अहमदपूर - निर्भय अहमदपूर ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रशासनाने आता आश्र्वासनांपलीकडे जाऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

# प्रा. महेंद्र आल्टे यांना शिक्षणशास्त्र विषयात पीएच.डी. प्रदान

**मुरूड/प्रतिनिधी :** येथील प्रा. महेंद्र शकुंतला अच्युतराव आल्टे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेंतर्गत शिक्षणशास्त्र विषयात पीएच.डी.(डॉक्टरेट) पदवी प्रदान करण्यात आली आहे. प्रा. आल्टे यांनी प्राचार्य डॉ. गौतम गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केलेल्या ''लातूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांतर्गत राबविण्यात येणाऱ्या बाला उपक्रमाच्या अंमलबजावणीचा आणि उपयोगितेचा चिकित्सक अभ्यास'' या संशोधन प्रबंधास मान्यता मिळाली आहे.

नांदेड विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र संकुलात आयोजित मौखिक परीक्षेनंतर प्रा. महेंद्र शकुंतला अच्युतराव आल्टे यांना शिक्षणशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील आंतरविद्याशीय अभ्यासविद्याशाखेचे अधिष्ठाता प्रोफेसर डॉ. चंद्रकांत बाविस्कर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मौखिक परीक्षेसाठी बहिस्थ परीक्षक म्हणून कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन सोलापूर येथील प्रोफेसर डॉ. आयेशा रंगरेज, शिक्षणशास्त्र शैक्षणिक संकुलाच्या संचालक प्रोफेसर डॉ. वैजयंता पाटील, संशोधन मार्गदर्शक प्राचार्य डॉ. गौतम गायकवाड, प्राचार्य डॉ. बालाजी गिरगावकर, प्रा. डॉ.महेश जोशी, प्रा. डॉ. सुनिता पाटील, प्रा. डॉ. अशोक गिनगिने, प्रा. डॉ.भीमा केंगले, डॉ. दिलीप राठोड, प्रा.महेश स्वामी आणि अनेक संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

प्रा. आल्टे यांनी लातूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांतर्गत राबविण्यात येणाऱ्या बाला उपक्रमाच्या अंमलबजावणीचा आणि उपयोगितेचा चिकित्सक अभ्यास या विषयावर संशोधन केले असून सदरील संशोधन हे मौलिक स्वरूपाचे आहे. प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्ता वाढीसाठी आणि सार्वत्रिकीकरणासाठी संशोधनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्रा.महेंद्र आल्टे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल नांदेड विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता प्रोफेसर डॉ.चंद्रकांत बाविस्कर, शिक्षणशास्त्र संकुलाच्या संचालिका प्रोफेसर डॉ.वैजयंता पाटील, संशोधन मार्गदर्शक प्राचार्य डॉ. गौतम गायकवाड, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हुशारसिंग साबळे, पदव्युत्तर विभागाचे उपकुलसचिव श्री. रवी मोहरीर, दै.महावृत्तचे संपादक अशोक हनवते, प्राचार्य डॉ. बालाजी लाहोरकर, प्राचार्य डॉ. बालाजी गिरगावकर, राष्ट्रसंत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. विरेंद्र निमजे, प्राचार्य डॉ. गोपाळ पवार, प्राचार्य डॉ. कैलास मोटे, प्राचार्य डॉ. अशोक काळम, प्राचार्य डॉ. रत्नाकर म्हस्के, प्राचार्य डॉ. प्रकाश कांबळे, प्राचार्या डॉ. वैशाली शितोळे, ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ. दत्तात्रय मेंढेकर, अधिव्याख्याता शिवशंकर मोरे, अधिव्याख्याता उमेश नरवडे, अधिव्याख्याता योगेश्वरी नाडे, अधिव्याख्याता शरीफ शेख, प्रो. डॉ.मधुकर चावरे, प्रा. डॉ. एम.एस. बिडवे, प्रा. एम.बी. गायकवाड, प्रा. डॉ.बी.एम.गोरे, प्रो. डॉ. एच.एस वाघमारे, प्रा. डॉ. एस.एन उबाळे, प्रो. डॉ. जी. एल.



जाधव, प्रा. डॉ. पी.एस. देशमुख, प्रा. सौ. पी. बी. महाजन, मुख्याध्यापक बालाजी आल्टे, मुख्याध्यापक टी. डी. कांबळे, प्रा.डॉ. प्रशांत भंडे, प्रा. डॉ. धनराज बिराजदार, डॉ. शिवलिंग नागापुरे, प्रा.सुनील सरकटे, प्रा. नंदकिशोर गवई, प्रा.डॉ. दिलीप राठोड, प्रा. बाबासाहेब अंकुश, प्रा. रविंद्र तनमोर, प्रा. राहुल पवार, प्रा. सचिन मोरे, प्रा. शैलेंद्र सुतार, प्रा. उमेश रणदिवे, प्रा. निखिल नाडे यांच्यासह प्रा.आल्टे यांचे कुटुंबीय, मित्रमंडळ, नातेवाईक तसेच विविध प्रशासकीय अधिकारी,विविध शैक्षणिक संस्था, प्राचार्य, शिक्षक,विद्यार्थी, पालक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, विविध प्राध्यापक संघटनेचे पदाधिकारी आणि मित्रपरिवार यांनी प्रा. महेंद्र शकुंतला अच्युतराव आल्टे यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयात डॉ. एस.आर.रंगनाथन यांची जयंती साजरी

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.१२ ऑगस्ट २०२६ रोजी भारतीय ग्रंथालयशास्त्रज्ञ आणि आधुनिक भारतीय ग्रंथालय चळवळीचे जनक डॉ.एस.आर.रंगनाथन यांची जयंती राष्ट्रीय ग्रंथपाल दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ.एस.आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सर्वांना जयंतीच्याही शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी पर्यवेक्षिका डॉ.संध्या वाडीकर,ग्रंथपाल प्रा.किरण भिसे,आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार, डॉ.अमोल ठोसर, डॉ.सुरज कोल्हे, बाळू क्षीरसागर,शंकुतला हालसे, शिवकन्या माने,निकीता राठोड यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# ॲट्रॉसिटी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नागरिकांचे सहकार्य गरजेचे ! लातूर येथील कार्यशाळेत कायद्याबाबत जनजागृती

**लातूर/प्रतिनिधी :** नागरी हक्क संरक्षण विभाग नांदेड अंतर्गत लातूर नागरी हक्क विभाग व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ११ ऑगस्ट रोजी लातूर समाज कल्याण सहाय्यक आयुक्त कार्यालय येथे अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याबाबत (ॲट्रॉसिटी ॲक्ट) कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन नांदेड परिक्षेत्राचे नागरी हक्क संरक्षण पोलीस उपअधीक्षक अभिजीत पाटील, लातूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी समिरसिंह साळवे, समाज कल्याणचे प्रादेशिक उपायुक्त उमेश सोनवणे, सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड, सेवानिवृत्त न्यायाधीश जगदीश जोशी, सत्र न्यायालयाचे सहाय्यक सरकारी अभियोक्ता लक्ष्मण शिंदे, नागरी हक्क संरक्षण पथकाचे पोलीस निरीक्षक श्रीशैल्य कोले व सुनिता शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.

कार्यक्रमाप्रसंगी बोलताना बार्टीचे डॉ. बबन जोगदंड यांनी सांगितले की, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याचा प्रचार-प्रसार होणे आणि त्याची योग्य अंमलबजावणी होण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांबरोबरच नागरिकांचीही मोठी जबाबदारी आहे. समाजात या कायद्यांतर्गत गुन्हे घडूच नयेत, यासाठी नागरिकांनी सजग व जागरूक राहणे आवश्यक आहे.

सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश सतीश जगताप, तसेच दयानंद महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य लक्ष्मण राव यांनी अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ व सुधारणा अधिनियम २०१५ मधील विविध तरतुदी, कायदेशीर सुधारणा, न्यायालयीन प्रक्रिया, पीडितांना मिळणारी मदत व पुनर्वसन याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. सोबतच उपस्थित पोलीस अधिकारी, सामाजिक न्याय विभागातील अधिकारी व इतर वक्त्यांनी ॲट्रॉसिटी कायद्याची सद्यस्थिती व विविध कलमांची माहिती दिली. समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# दिल्ली - पुणे विमानात तांत्रिक बिघाड; प्रवाशांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला!

नवी दिल्ली : दिल्लीहून पुण्याकडे येणाऱ्या स्पाइसजेटच्या विमानात उड्डाणापूर्वी तांत्रिक बिघाड झाल्याची घटना समोर आली आहे. विमानात बसल्यानंतर अचानक तापमान वाढल्याने प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले. काही प्रवाशांना श्वास घेण्यासही अडचण येत असल्याचा दावा करण्यात आला. परिस्थिती गंभीर असतानाही विमान धावपट्टीवर नेण्यात आल्याने प्रवाशांनी उड्डाणाला तीव्र विरोध केला. अखेर प्रवाशांच्या सतर्कतेमुळे विमानातील बिघाड लक्षात आला आणि सर्व प्रवाशांना विमानाबाहेर काढण्यात आले. त्यामुळे संभाव्य मोठा अनर्थ टळल्याचे सांगितले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिल्लीहून पुण्याला जाणाऱ्या या विमानात लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत अनेक प्रवासी होते. विमानात बसल्यानंतर अचानक तापमान वाढल्याने प्रवाशांना असह्य उकाड्याचा सामना करावा लागला. काही प्रवासी अक्षरश: घामाने भिजले होते, तर काहींना श्वास घेण्यास त्रास होत असल्याचे सांगण्यात आले. विमानातील परिस्थिती पाहता प्रवाशांनी विमान उड्डाण करू नये, अशी मागणी केली.

प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, समस्या कायम असतानाही विमान धावपट्टीवर नेण्यात आले. त्यामुळे विमानात मोठा गोंधळ निर्माण झाला. काही प्रवाशांनी आरडाओरड करत उड्डाणाला विरोध केला. प्रवाशांनी केलेल्या विरोधानंतर वैमानिक आणि विमान कर्मचाऱ्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर विमानात तांत्रिक बिघाड असल्याचे निदर्शनास आल्याचे सांगण्यात येते. अखेर प्रवाशांना विमानातून बाहेर काढण्यात आले. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या प्रवाशांनी विमानतळावरच ठिय्या आंदोलन केले. विमान कंपनीच्या सेवेवर प्रश्न उपस्थित करत प्रवाशांच्या सुरक्षेशी तडजोड करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. तांत्रिक बिघाड असताना विमान उड्डाणासाठी धावपट्टीवर नेण्यात आले का, प्रवाशांनी सुरुवातीला केलेल्या तक्रारींकडे दुर्लक्ष का करण्यात आले आणि विमानाच्या सुरक्षेच्या सर्व नियमांचे पालन करण्यात आले होते का, असे प्रश्न प्रवाशांकडून उपस्थित करण्यात येत आहेत.

## हमने सुना था एक है भारत, सब मुल्कोंसे नेक है भारत!

स्वातंत्र्याला ७९ वर्षे पूर्ण झाली आता आपण ८०वा स्वातंत्र्यदिन साजरा करणार आहोत पण आजही वर्गात उभा राहून एक शिक्षक जेव्हा मुलांना शिकवतो अनेक विविधता असूनही आपण एक देश म्हणून एक आहोत. एक है भारत, सब मुल्कोंसे नेक है भारत तर मुलं विचारतात तुम्ही सांगता तसं आम्हाला कुठेही दिसत नाही. धर्म जुदा है, जात जुदा है तेव्हा काळजाला चर्र होतं.... हे गीत आहे १९५९ च्या दीदी या चित्रपटातील. सुनील दत्त यांचा शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांशी तो संवाद आणि 'हमने सुना था एक है भारत' हे गीत आज २०२६ मध्येही सर्वांना विचार करायला भाग पाडते. कारण ६७ वर्षांपूर्वी जे प्रश्न विचारले गेले होते, त्याच प्रश्नांना आपण आजही उत्तर देऊ शकलेलो नाही यापेक्षा मोठे अपयश काय असू शकते. सदियों तक इस देश में जो रही हुकूमत गैरों की, उन्हीं विदेशी आकाओं की सोची समझी बख्शीश है, ये जो बैर है एक दूजे से. हे फक्त गाण्याचे बोल नाहीत, हे आपल्या सामाजिक वास्तवाचा शेरा आहे. स्वातंत्र्य मिळालं, संविधान मिळालं, पण एकसंघ भारत घडवण्याची जबाबदारी कुणाची होती. राज्यकर्त्यांची? ज्यांनी आजपर्यंत विकासाच्या नावाखाली फक्त मतांचं, धर्माचं, जातीचं राजकारण केलं आणि द्वेष पसरविला. समाजाची? ज्याने जात, धर्म, भाषा याच्या भिंती पाडण्याऐवजी अधिकच उंच केल्या. शिक्षण व्यवस्थेची? जिने इतिहास शिकवला पण माणूस म्हणून जगायला कधीच शिकवलं नाही. परिणाम? आज ७९ वर्षांनंतरही आम्ही उच्च-नीच, मंदिर-मस्जिद, गरीब-श्रीमंत, प्रांतवाद, भाषावाद याच चर्चेत अडकलो आहोत. शिक्षण, बेरोजगारी, आरोग्य, सामाजिक सलोखा या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत.

'जन्म से कोई नीच नहीं' हे तत्व अजूनही पुस्तकातच असून आजही आपल्या अनेक पिढ्या यापासून दूरच राहिल्या किंबहुना ठेवल्या गेल्या. आजही जन्मानेच सगळे ठरते कर्माने आणि कर्तृत्वाने नाही. गीताचा सगळ्यात मार्मिक भाग: 'जो नफरत की शिक्षा दे वो धर्म नहीं है लानत है। जन्म से कोई नीच नहीं है जन्म से कोई महान नहीं, कर्म से बढ़कर किसी मनुष्य की कोई भी पहचान नहीं.' हे या गीतातून १९५९ मध्ये सांगितलं गेलं. आज २०२६ मध्ये सोशल मीडियावर ट्रोल, द्वेष, भेदभाव अजूनही त्याच वेगाने चालू आहे. म्हणजे गेल्या ३ पिढ्या या संदेशाला समजून घ्यायला अपयशी ठरल्या. ही कोणाची चूक? आता मात्र जबाबदारी जेन झी आणि जेन अल्फाची. 'अब तो देश में आजादी है अब क्यों जनता फरियादी है' हा प्रश्न जेंव्हा विद्यार्थी शिक्षकास विचारतो याला उत्तर देताना शिक्षक विद्यार्थ्यांना प्रेमाने सांगतो की 'नवयुग आप नहीं आएगा नवयुग को तुम लाओगे.' हेच आजच्या जेन झी आणि जेन अल्फासाठीचे प्रमुख आव्हान आहे. का त्यांच्याकडून अपेक्षा तर ही पिढी डिजिटल नेटिव्ह आहे. त्यांच्यासाठी धर्म-जात-भाषा-पंथ-लिंग या सीमा ऑनलाइन तुटतात. एक गेम, एक मिम, एक रील सगळ्यांना एकत्र आणू शकतं हे या पिढीने सिद्ध केले आहे. हे थेट प्रश्न विचारतात : 'कुछ इंसान छुत क्यों है कुछ इंसान अछूत क्यों है?' जुनी पिढी गप्प बसायची हे कृती करतात फक्त बोलत नाहीत. स्वातंत्र्य, समता, बंधुता यासाठी ते रस्त्यावर उतरतात. गीताच्या शेवटी शिक्षक म्हणतो तुम ही रंग भरोगे इनमें म्हणजे हे उजाड रान (गुलशन) तुम्हालाच फुलवायचा आहे. नवयुग येणार नाही तो आणावा लागेल. शिक्षण म्हणजे फक्त गुण मिळविणे नाही, तर सहिष्णुता शिकवली पाहिजे. वर्गात गीता, कुराण, बायबलपेक्षा आपले संविधान, मानवता हा विषय मोठा केला पाहिजे. विरोध म्हणजे शत्रू नाही. तेग-बाजी (तलवारबाजी) नको, संवाद गरजेचा आहे. राजकीय नेते, सेलिब्रिटी, शिक्षक यांनी आधी एकसंघ होऊन दाखवावं. ६७



वर्षांपूर्वी एका चित्रपटाने विचारलेला प्रश्न आजही अनुत्तरीत आहे. यात एक देश म्हणून आपले अपयश आहे. पण अजूनही वेळ गेली नाही. जेन झी, जेन अल्फा तुमच्या हातात मोबाईल आहे, आवाज आहे, संधी आहे. इस उजड़े गुलशन पर रंगत आते आते आएगी... ती रंगत आता तुम्हीच भरा आमच्याने ते झाले नाही हे आम्ही मान्य करतो. कारण भारत एकसंघ हे फक्त स्वातंत्र्यदिनी बोलायचं ब्रीदवाक्य राहू नये, किंवा आम्ही भारतीय लोक हे केवळ संविधानाच्या प्रस्तावनेत, भाषणात न राहता ती आपल्या जगण्याची पद्धत व्हावी हीच अपेक्षा.

जय हिंद

**-सतीश तांदळे**
**माझं लातूर परिवार**

# केज शहराच्या नवीन पाणीपुरवठा योजनेच्या ११७ कोटी ६६ लाख ७९ हजार ३०० रुपयाच्या निधीला मिळाली तांत्रिक मंजुरी

### - केज शहराला पाण्याचा थेंबही कमी पडू देणार नाही-हारुणभाई इनामदार

### - राज्याचे मुख्यमंत्री, दोन्हीही उपमुख्यमंत्री यांच्यासह लोकप्रतिनिधी व वरिष्ठांचे हारुणभाई व सीताताईंनी मानलेआभार

**केज/प्रतिनिधी** :केज शहराच्या नवीन पाणीपुरवठा योजनेच्या ११७ कोटी ६६ लाख ७९ हजार ३०० रुपयाच्या निधीला तांत्रिक मंजुरी मिळाली आहे. त्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा व बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्यासह लोकप्रतिनिधी व वरिष्ठांचे आणि पत्रकार बांधवांचे राष्ट्रवादी अजित दादा पवार पक्षाचे नेते तथा गटनेते ज्येष्ठ डॉ. हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा डॉ. सौ.सीताताई यांनी आभार मानले.





आयोजित पत्रकार परिषदेमध्ये बोलताना ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार यांनी म्हटले की, केज शहराला पाण्याचा थेंबही कमी पडू देणार नाही, नवीन पाणीपुरवठा योजनेचा शासन स्तरावर पाठपुरावा करून सर्व प्रक्रिया पूर्ण करून येत्या तीन महिन्यात कामाला प्रत्यक्षात सुरुवात करणार आहेत.या योजनेचे काम पूर्ण करण्यासाठी किमान दोन ते अडीच वर्षाचा कालावधी लागेल. तर नगराध्यक्षा डॉ.सौ. सीताताई बनसोड यांनी बोलताना सांगितले की, सध्याची जुनी पाणीपुरवठा योजना ही जीर्ण झालेली असल्यामुळे सतत ना दुरुस्त होत आहे आम्ही वेळोवेळी दुरुस्तीचे काम करत आहोत त्याचबरोबर शहरात मोठ्या प्रमाणात गरजेनुसार बोरवेल घेतलेले आहेत व आज रोजी बोरवेल घेण्याचे काम चालू आहे.

यापुढेही भविषात गरजेनुसार आम्ही बोरवेल चे नियोजन करून पाण्याचा प्रश्न मार्गी लावत आहोत, नागरिकांना पाण्याची अडचण भासू देणार नाहीत. शहरातील विविध विकास कामे करण्यासाठी,नागरी सुविधा,नागरिकांच्या मूलभूत गरजा सोडवण्यासाठी आमचे नेते हारुणभाई इनामदार व मी आणि आमचे सर्व नगरसेवक आम्ही कट्टीबद्ध आहोत असे बोलतांना सांगितले.


स्व. विमलताई मुंदडा यांच्या कार्यकाळामध्ये केज शहराला पाणीपुरवठा योजना कार्यविनित करण्यात आली होती परंतु हे पाणीपुरवठा योजनेचा कालावधी हा जवळपास तीस ते पस्तीस वर्षाचा झालेला असून सदर योजना ही निकामी झालेली आहे त्याचबरोबर केज शहराची वाढती लोकसंख्या व पूर्वीच्या लोकसंख्येत आणि आज रोजी च्या लोकसंख्येमध्ये केज शहराची व्याप्ती वाढलेली आहे. यामुळे केज शहरात गेल्या अनेक वर्षापासून पाण्याचा प्रश्न ज्वलंत व भेडसवणारा होता. जनविकास परिवर्तन आघाडीच्या माध्यमातून केज नगरपंचायत ची सत्ता गटनेते हारूणभाई इनामदार नगराध्यक्षा सौ.सीताताई यांच्याकडे आली तेव्हापासून केज शहराच्या विकासातील सर्वात ज्वलंत असा मोठा पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासन स्तरावर गटनेते हारूणभाई इनामदार, नगराध्यक्षा सौ सीताताई बनसोड यांनी पाठपुरावा करून नवीन पाणीपुरवठा योजनेला तांत्रिक मंजुरी मिळवली आहे. या महत्वकांक्षी योजनेमुळे पाणी योजनेचा प्रश्न हा निर्णय टप्प्यापर्यंत पोहोचला आहे. उर्वरित प्रक्रिया ही येणाऱ्या तीन महिन्याच्या कालावधीत पूर्ण करून प्रत्यक्षात कामाला सुरुवात करण्यात येणार आहे अशी माहिती गटनेते हारूणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिले आहे.

केज नगरपंचायत वर जनविकास परिवर्तन आघाडीची सत्ता येताच गटनेते व नगराध्यक्षा यांनी या योजनेचा पाठपुरावा करण्यास सुरुवात केली असता पूर्वीची ही योजना ३५ कोटी रुपयाची प्रस्तावित होती. परंतु यामध्ये सध्याची शहराची वाढती लोकसंख्या व पुढील ३० ते ३५ वर्षांमध्ये वाढणारी लोकसंख्या याचा लेखाजोखा घेऊन वेळोवेळी तज्ञांचे मार्गदर्शन व वरिष्ठांच्या सल्ल्याने आणि सखोल अभ्यास करून भविष्यातील वाढती लोकसंख्या, पाण्याची गरज, जुल साठवण क्षमता, चेहरा अंतर्गत पाईपलाईन, पाणीपुरवठा योजनेसाठी लागणारा वीजपुरवठा सर्व टेक्निकल, तांत्रिक बाबींचा अभ्यास करून व आढावा घेऊन सदर योजनेत आवश्यक ते बदल करून११७ कोटी ६६ लाख ७९ हजार ३०० रुपयाची या योजनेला तांत्रिक मंजुरी मिळाली आहे. या योजनेमध्ये धनेगाव पासून ते केज शहरा पर्यंत व शहरातील अंतर्गत पाईपलाईन यासह जवळपास ९० ते ९६ किलोमीटरची नवीन पाईपलाईन, शहरातील बीड रोडवरील सध्याच्या पाणीच्या टाकीच्या येथे-२, भवानी माळ येथे-१ बीड रोडवरील कचरा डेपो येथे-१, कळंब रोड परिसरात-१ अशा एकूण ५ नवीन पाण्याच्या टाक्या (जलकुंभ), विद्युत पुरवठा साठी सौर ऊर्जा प्रकल्प, पंपिंग व्यवस्था, शहरातील अंतर्गत पाईपलाईन करतेवेळी रस्त्यांची दुरुस्ती, यासह इतर नाविन्यपूर्ण बाबीच्या आधारे ही योजना केज शहराच्या चारीही बाजूंच्या सीमा हद्दीपर्यंत राबविण्यात येणार आहे. त्यामुळे या नवीन पाणीपुरवठा योजनेमुळे शहरातील पाणी वितरण व्यवस्था ही अधिक सक्षम होणार असून याचा शहरवासीयांना नियमित वेळे त मोठ्या प्रमाणावर पाणी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने याचा फायदा शहरवासीयांना होणार आहे असे पत्रकार परिषदेत गटनेते हारूणभाई इनामदार, नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोडे यांनी माहिती दिली. ही योजना केज शहरासाठी भविष्यात फायद्याची ठरणारी आहे या योजनेला तांत्रिक मान्यता मिळणे हा महत्त्वाचा टप्पा होता यापुढे शासकीय मान्यता, निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करून प्रत्यक्ष कामाला तीन महिन्यात सुरुवात करण्यात येणार आहे. या योजनेचा पाठपुरावा करत असताना स्व. अजित दादा पवार यांनी केलेले सहकार्य व पाठपुरावा आणि प्रयत्न याची आठवण हरून भाई व सीताताई बनसोड यांनी आवर्जून केली आहे. स्वर्गीय अजितदादा यांच्या निधनानंतर या योजनेसाठी राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांनी सकारात्मक भूमिका घेऊन सहकार्य केल्याबद्दल त्यांचे हारुणभाई इनामदार व सीताताई बनसोडे यांनी विशेष आभार मानले. केज शहराचा विविध विकास कामे करत असताना कुठल्याही प्रकारचे राजकारण न करता फक्त आणि फक्त आपल्या गावाचा विकास हेच ध्येय साकारून आम्ही पारदर्शक कारभार करत आहोत. केज नगरपंचायत च्या कामकाजात कसल्याच प्रकारचा भ्रष्टाचार झालेला नाही आम्ही भ्रष्टाचाराला थरा दिला नाही व भविष्यात दिला जाणार नाही अशी गटनेते हारूणभाई इनामदार यांनी ठाम भूमिका मांडली. आम्हाला जनतेने सेवक म्हणून काम करण्याची संधी दिली आहे त्यामुळे आम्ही कायम जनतेचा विश्र्वास ठेवत आलो आहोत याही पुढे आम्ही विकास कामे पारदर्शकपणे पूर्ण करण्याची आमची जबाबदारी आहे. आम्ही केज वासीयांना दिलेला शब्द पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहोत असे आश्र्वासन केजवासीयांना पत्रकार परिषदेच्या माध्यमातून इनामदार व बनसोड यांनी दिले आहे.

# वर्षावास : बुद्धांच्या धम्मापासून संविधानाच्या मूल्यांपर्यंतचा प्रवास

## पावसाच्या सरींनी माती भिजते, पण विचारांच्या सरींनी समाज बदलतो!

पाऊस सुरू झाला की निसर्गाचा चेहराच बदलतो. उन्हाने करपलेली धरती हिरवीगार होते. झाडांच्या फांद्यांवर नवी पालवी फुटते. नद्या वाहू लागतात. मातीचा सुगंध मनाला वेढून टाकतो. आकाशातून बरसणारा प्रत्येक थेंब जणू एकच संदेश देतो, जुने धुऊन काढा आणि नव्याला जागा द्या! बौद्ध परंपरेतील वर्षावास याच अर्थाने केवळ धार्मिक परंपरा नाही तर तो आत्मपरीक्षणाचा, संयमाचा, प्रबोधनाचा आणि सामाजिक जबाबदारीचा काळ आहे. भगवान बुद्धांच्या काळात पावसाळ्यात भिक्षूंनी एका ठिकाणी राहून साधना, अध्ययन, चिंतन आणि धम्मचर्चा करण्याची परंपरा विकसित झाली. या परंपरेच्या केंद्रस्थानी होती अहिंसा, करुणा, विवेक आणि आत्मशुद्धी. आज दोन हजार पाचशे वर्षांनंतर वर्षावासाकडे पाहताना त्याचा अर्थ आणखी व्यापक होतो. कारण बुद्धांचा धम्म आणि भारतीय संविधानाची मूल्यव्यवस्था यांच्यात एक मूलभूत समान धागा दिसतो, माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा देणे.





बुद्धांनी माणसाला जन्मावरून श्रेष्ठ-कनिष्ठ मानण्यास नकार दिला. त्यांनी कर्मकांडापेक्षा आचरणाला, अंधश्रद्धेपेक्षा विवेकाला आणि दैववादापेक्षा मानवी प्रयत्नांना महत्त्व दिले. संविधानानेही नागरिकाच्या जन्म, जात, धर्म, लिंग किंवा भाषेच्या आधारावर भेदभाव नाकारून समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता या मूल्यांना राष्ट्रजीवनाचा पाया दिला. म्हणूनच वर्षावास हा बुद्धांच्या धम्मातून संविधानाच्या मूल्यांकडे जाणारा एक वैचारिक पूल ठरू शकतो. वर्षावास म्हणजे स्वतःच्या मनाचा संविधान लिहिणे! संविधान देशासाठी कायदे आणि मूल्यांची चौकट निर्माण करते, पण समाजाचे खरे परिवर्तन केवळ कायद्याने होत नाही. कायद्यापेक्षा आधी माणसाच्या मनात बदल घडावा लागतो. संविधान म्हणते, सर्व नागरिक समान आहेत. पण आपल्या मनात अजूनही जातीय श्रेष्ठत्वाची भावना असेल तर समता कागदावरच राहते. संविधान स्वातंत्र्य देते, पण आपण दुसऱ्याच्या विचार स्वातंत्र्याचा आदर करीत नसू तर ते स्वातंत्र्य अपुरे ठरते. संविधान बंधुतेची भाषा करते, पण धर्म, जात आणि राजकीय मतभेदांच्या नावावर आपण एकमेकांचा द्वेष करत असू तर बंधुता कुठे उरते? म्हणूनच वर्षावासाचा काळ स्वतःला प्रश्न विचारण्याचा आहे, आपल्या मनात संविधान आहे का? हीच खरी परीक्षा आहे.

भारतीय समाजात जातिभेदाच्या भिंती अतिशय जुन्या आहेत. जन्माच्या आधारावर माणसाची किंमत ठरविण्याची व्यवस्था शतकानुशतके समाजात रुजली. अशा काळात बुद्धांनी माणसाच्या मूल्याचे मोजमाप त्याच्या जन्माने नव्हे, तर त्याच्या आचरणाने केले, हा विचार क्रांतिकारी होता. बुद्धांच्या संघात विविध सामाजिक स्तरांतील लोकांना स्थान मिळाले. स्त्रियांनाही संघात प्रवेश देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. त्यामुळे बुद्धांचा धम्म हा केवळ आध्यात्मिक मुक्तीचा मार्ग नव्हता; तो मानवी प्रतिष्ठेचा आणि सामाजिक समतेचा विचार होता. याच मूल्यांची आधुनिक अभिव्यक्ती भारतीय संविधानात दिसते. संविधानातील समतेचा अधिकार हा केवळ कायदेशीर कलम नाही. तो हजारो वर्षांच्या सामाजिक विषमतेविरुद्धचा आधुनिक प्रतिकार आहे. म्हणून वर्षावासात बुद्धांना स्मरण करणे म्हणजे केवळ बुद्धवंदना नव्हे, तर बुद्धांच्या समतेच्या विचाराला आपल्या आचरणात उतरवणे होय.

करुणा आणि बंधुता हे दोन शब्द असून एकच आत्मा आहे. बुद्धांच्या शिकवणीत करुणेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. दुसऱ्याच्या दुःखाकडे पाहून मन हेलावणे आणि त्या दुःखाच्या निवारणासाठी कृती करणे म्हणजे करुणा. संविधानाच्या उद्देशिकेतील 'बंधुता' हीदेखील याच मानवी संवेदनशीलतेची आधुनिक सामाजिक अभिव्यक्ती आहे. आज मात्र आपण विचित्र काळातून जात आहोत. एका माणसाचे दुःख दुसऱ्यासाठी मनोरंजन बनते. सोशल मीडियावर अपमानाचे व्हिडिओ व्हायरल होतात. एखाद्या व्यक्तीच्या जात-धर्मावरून त्याच्या वेदनेचे मूल्य ठरविले जाते. गरीब, शेतकरी, कामगार, स्थलांतरित, बेरोजगार तरुण किंवा वंचित समाजघटक यांच्या प्रश्नांकडे अनेकदा केवळ आकडेवारी म्हणून पाहिले जाते. अशा वेळी बुद्धांची करुणा आणि संविधानाची बंधुता दोन्ही आपल्याला एकच प्रश्न विचारतात तुला दुसऱ्याचे दुःख खरोखर जाणवते आहे का? जर उत्तर 'नाही' असेल, तर वर्षावास अजून संपलेला नाही.

बुद्धांनी कोणतीही गोष्ट केवळ परंपरा आहे म्हणून स्वीकारू नका, असा विवेकवादी दृष्टिकोन दिला. विचार करा, तपासा, अनुभव घ्या आणि मग स्वीकारा, ही विचारपद्धती आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोनाशी जवळीक साधणारी आहे. भारतीय संविधान नागरिकांना वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधक वृत्ती विकसित करण्याचे कर्तव्य सांगते. इथे बुद्ध आणि संविधान पुन्हा एकाच दिशेने उभे दिसतात. आज सोशल मीडिया अफवांनी भरलेला आहे. खोटी माहिती क्षणात हजारो लोकांपर्यंत पोहोचते. धर्माच्या, जातीय अस्मितेच्या किंवा राजकीय भावनांच्या नावावर तथ्यांपेक्षा भावनांना महत्त्व दिले जाते. अशा काळात वर्षावास म्हणजे विचारांचा उपवास देखील असायला हवा अफवांपासून, द्वेषापासून, अंधानुकरणापासून आणि पूर्वग्रहांपासून.

वर्षावासाच्या काळात विहारांमध्ये प्रवचन, धम्मचर्चा आणि ध्यानधारणा होतात. ही परंपरा महत्त्वाची आहे. पण तिची खरी फलश्रुती विहाराच्या चार भिंतींच्या बाहेर दिसली पाहिजे. वर्षावासाच्या निमित्ताने एखाद्या विद्यार्थ्याला पुस्तक मिळाले, एखाद्या व्यसनाधीन तरुणाला व्यसनमुक्तीचा मार्ग मिळाला, एखाद्या गरीब कुटुंबाला आधार मिळाला, एखाद्या मुलीच्या शिक्षणासाठी मदत झाली, एखाद्या अन्यायग्रस्त व्यक्तीला न्यायासाठी साथ मिळाली, एखाद्या गावात संविधानाचे वाचन झाले, तर तो वर्षावास अधिक अर्थपूर्ण ठरेल. धम्म जर समाजाच्या अश्रूंपर्यंत पोहोचत नसेल, तर तो केवळ प्रवचनात अडकलेला धम्म आहे. बुद्धांनी दुःख ओळखले आणि त्याच्या कारणांचा शोध घेतला. संविधानानेही सामाजिक अन्याय, विषमता आणि शोषणाविरुद्ध न्यायाची चौकट निर्माण केली. म्हणून आजच्या वर्षावासात ध्यानाबरोबर संविधान वाचले पाहिजे. बुद्धवंदनेबरोबर समतेची शपथ घेतली पाहिजे धम्मचर्चेबरोबर सामाजिक प्रश्नांवर चर्चा केली पाहिजे आणि करुणेबरोबर प्रत्यक्ष कृती केली पाहिजे.

आज धर्म हा अनेकदा माणसाला जोडण्याऐवजी विभाजित करण्यासाठी वापरला जातो. जातीय द्वेष, धार्मिक ध्रुवीकरण आणि असहिष्णुता वाढत असताना बुद्धांचा मध्यममार्ग अधिक महत्त्वाचा ठरतो. बुद्धांचा धम्म कोणावर विजय मिळविण्याची भाषा करत नाही; तो स्वतःच्या विकारांवर विजय मिळविण्याची भाषा करतो. आज आपल्याला इतर धर्मांशी लढण्यापेक्षा स्वतःच्या मनातील द्वेषाशी लढण्याची गरज आहे. दुसऱ्याच्या श्रद्धेचा अपमान करण्यापेक्षा स्वतःच्या अहंकाराचे परीक्षण करण्याची गरज आहे आणि संविधान बदलण्याची भाषा करण्यापेक्षा संविधानाच्या मूल्यांनुसार स्वतःला बदलण्याची गरज आहे. भारतीय संविधान हे केवळ शासन चालविण्याचे पुस्तक नाही. ते भारताने स्वतःला दिलेले नैतिक वचन आहे. न्याय प्रत्येकाला मिळावा, स्वातंत्र्य प्रत्येकाला अनुभवता यावे, समता प्रत्येकाला मिळावी आणि बंधुता प्रत्येकाच्या मनात रुजावी, ही मूल्ये प्रत्यक्ष जीवनात आणायची असतील तर बुद्धांचा विचार आपल्याला मोठी नैतिक ताकद देतो.



या वर्षावासात आपण किती प्रवचने ऐकली, किती कार्यक्रम केले, किती फुले वाहिली, किती बुद्धवंदना केल्या यापेक्षा एक प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे, तो म्हणजे आपल्या वागण्यात बुद्ध किती उतरले? आपल्या निर्णयात संविधान किती उतरले? आपल्या नात्यांत समता किती आली? आपल्या शब्दांत करुणा किती आली? आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य किती आले? जर या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची तयारी आपण केली, तर वर्षावास खऱ्या अर्थाने सुरू झाला असे समजावे. कारण वर्षावास हा पावसाळ्यातील मुक्काम नाही, तर तो मनुष्यत्वाच्या पुनर्जन्माची प्रक्रिया आहे. आकाशातून पडणाऱ्या पावसाच्या प्रत्येक थेंबासोबत आपण एक संकल्प करू या. द्वेष धुऊन काढू या, अंधश्रद्धेवर विवेकाची मशाल पेटवू या, जातिभेदाच्या भिंती पाडू या, करुणेने माणसाला माणसाशी जोडू या आणि बुद्धांच्या प्रज्ञेतून संविधानिक भारत घडवू या! कारण अखेरीस प्रश्न बुद्ध किती मोठे होते, हा नाही. प्रश्न हा आहे की, बुद्धांचा विचार आपल्याला किती मोठा माणूस बनवतो? आणि संविधान किती सुंदर आहे, हा देखील प्रश्न नाही. खरा प्रश्न असा आहे की, आपण संविधानातील मूल्यांनुसार किती सुंदर समाज घडवतो?याच आत्मपरीक्षणाचे नाववर्षावास!

बुद्धांची प्रज्ञा आपल्याला विवेक देते, बुद्धांची करुणा आपल्याला माणूस बनवते, बुद्धांची समता आपल्याला भेदाभेदापलीकडे नेते आणि संविधानाची न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता ही मूल्ये त्या विचारांना आधुनिक लोकशाहीची चौकट देतात. म्हणूनच वर्षावासाचा खरा अर्थ एका वाक्यात सांगायचा झाला तर बाहेर पावसाची प्रतीक्षा आणि आत परिवर्तनाची तयारी. पाऊस मातीला भिजवतो, तर विचार मनाला भिजवतात. पाऊस नदीला प्रवाह देतो, तर करुणा माणुसकीला प्रवाह देते. पाऊस धरतीला हिरवाई देतो, तर समता समाजाला नवी पालवी देते आणि संविधान त्या हिरवाईला न्यायाची दिशा देते. बुद्धांची प्रज्ञा, करुणा आणि समता आपल्या जीवनात रुजो, संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेची मूल्ये आपल्या आचरणातून अधिक बळकट होवोत, हीच सदिच्छा!सर्वांना वर्षावासाच्या हार्दिक मंगलमय शुभेच्छा!

-------------------

**प्रवीण बागडे**
नागपूर
मो.क्र. ९९२३६२०९१९

## मा. उषाताई शृंगारे मॅडम यांची उपजिल्हाधिकारी पदी पदोन्नती झाल्याबद्दल सत्कार



**केज/प्रतिनिधी :** भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा लातूर (पश्र्चिम)च्यावतीने गंगाखेड येथे कार्यरत असणाऱ्या तहसीलदार मा. उषाताई शृंगारे-गायकवाड यांची उपजिल्हाधिकारी या पदावर पदोन्नती झाली आहे. त्याबद्दल मा.उषाताई शृंगारे यांचा त्यांच्या निवासस्थानी जाऊन शाल ,पुष्पगुच्छ, पंचरंगी पट्टी व माता रमाई आंबेडकर स्मृतिग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्य संघटक प्रा. बापूसाहेब गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त करताना आपल्या समाजातील मुख्यपदावर गेलेल्या सर्व अधिकारी यांनी पीडित,वंचित, शोषित, घटकांना प्रशासनातून योग्य न्याय द्यावा, स्पर्धात्मक परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना आपले सतत मार्गदर्शन मिळावे त्यांना पुस्तके, अभ्यासक्रम इत्यादी बाबत मदत व्हावी, मुख्य पदावर गेल्यानंतर आपण समाजास विसरू नये समाज आपल्याकडे एक आदर्श व्यक्तिमत्व या भावनेने पाहतो आहे.

या प्रसंगी जिल्हा सरचिटणीस अभिमन्यू लामतुरे, संरक्षण विभाग जिल्हा उपाध्यक्ष राजाराम साबळे, समता सैनिक दल डिव्हिजन ऑफिसर विलास आल्टे, प्रचार व पर्यटन जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र क्षीरसागर, कायदेविषयक सल्लागार मंडळाच्या उपप्रमुख ज्ञानेश्र्वरीताई बटवाड, संस्कार विभाग जिल्हा सचिव प्रेमनाथ कांबळे, प्रचार पर्यटन जिल्हा सचिव आनंद डोणेराव, जिल्हा संघटक प्रा. भाऊराव कांबळे, लातूर तालुकाध्यक्ष अशोक कांबळे, तालुका संघटक प्रा. नवनाथ सोनवणे, शहराध्यक्ष बिभीषण माने, शहर कार्यालयीन सचिव शशिकांत धसवडकर, अंगद भालेराव, मॅडमचे बंधू राहुल जाधव इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

## क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले यांचे द्विशताब्दी जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम



**लातूर/प्रतिनिधी:** सर्व फुले प्रेमी तसेच केंद्र व राज्य सरकार च्या वतीने इसवी सन २०२६-२७ हे वर्ष क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले यांचे द्विशताब्दी जयंती वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. या समतावादी पवित्र वर्षाच्या निमित्ताने त्यांच्या विचाराचा वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी आणि समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम घेऊन जयंती साजरी करण्यासाठी आज क्रांती दिनाचे औचित्य साधून महात्मा जोतीराव फुले द्विशताब्दी जयंती उत्सव समीती महाराष्ट्र राज्य च्या वतीने लोगो चे अनावरण करण्यात आले. फुले दांपत्य यांचे विचार सर्वापर्यंत पोहोचले पाहिजेत हि भावना घेऊन कार्य करत असलेल्या सर्व फुले प्रेमी यांनी तन मन धन ने या द्विशताब्दी जयंती उत्सवाच्या निमित्त आयोजित रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीर, वृक्षारोपण, शिलाई मशीन वाटप, शैक्षणिक साहित्य वाटप, मिरवणूक, शोभा यात्रा, आरोग्य सेवा, अन्नसेवा, संसार उपयोगी साहित्य वाटप, स्वयंरोजगार साठी युवक व महिलांना आर्थिक साह्य, सार्वजनिक वाचनालय स्थापना अशा सामाजिक व संस्कृतिक कार्यकमात सहभागी व्हावे असे आवाहन मुख्य समन्वयक तथा महात्मा फुले ब्रिगेड चे प्रदेशाध्यक्ष दत्तात्रय चांबारगे - माळी, प्रदेश सरचिटणीस उत्तम गोरे, रासप नूतन जिल्हा अध्यक्ष शाम गोरे, हिप्परगा उपसरपंच तथा औसा वकील मंडळाचे सहसचिव ॲड. नितीन म्हेत्रे, महात्मा फुले सेवा मंडळ चे उपाध्यक्ष सुनिल वांजरवाडे, कविता गोरे, मंदोधरी माळी, कल्पना गोरे यांनी केले आहे.

महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती निमित्त २०० समाजसेवक तथा सामाजिक कार्यकर्ते, २०० शिक्षक, २०० डॉक्टर, २०० पत्रकार, २०० इंजिनियर, २०० विधिज्ञ, २०० विद्युत कर्मचारी, २०० ग्रामधिकारी, २०० कॉन्टॅक्टर, २०० तलाठी, २०० पोलीस पाटील, २०० सफाई कर्मचारी, २०० आजी माजी खासदार, २०० आजी माजी आमदार, २०० आजी माजी सरपंच, २०० आजी माजी जिल्हा परिषद सदस्य, २०० आजी माजी पंचायत समिती सदस्य, २०० लेखक/ कवी/ साहित्यिक, २०० वैद्यकीय सेवक, २०० शिक्षक तर कर्मचारी, २०० शैक्षणिक संस्था चालक, २०० विद्यार्थी, २०० शेतकरी, २०० कलाकार, २०० आजी माजी सैनिक, २०० आजी माजी पोलीस, २०० आजी माजी नगरसेवक, २०० आजी माजी नगराध्यक्ष तथा महापौर, २०० तंटामुक्ती अध्यक्ष, २०० सोसायटी चेअरमन यांचा विविध मान्यवर यांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे.

वरील सर्व कार्यक्रम आणि सन्मान व सत्कार सोहळे २१००० समन्वयक यांच्या परिश्रमातून व सुनियोजनातून आयोजित करण्यात आले आहेत. एक गाव एक समन्वयक या पद्धतीने समन्वयक यांची निवड करून त्यांना जबाबदारी देण्यात येणार आहे. ज्या फुले प्रेमी यांना यात सहभागी व्हावे असे वाटते त्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन महात्मा जोतीराव फुले द्विशताब्दी जयंती उत्सव समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

# ॲट्रॉसिटी ॲक्टचे खटले चालवण्या करिता राज्यात पाच अनन्य विशेष न्यायालय स्थापन करण्याचा शासन निर्णय निर्गमित

### सोलापुर,अहिल्यानगर, परभणी, नांदेड, यवतमाळ विशेष न्यायालयांची स्थापना होण्यासाठी ॲड.केवलजी उके यांच्या मार्गदर्शनात वैभवजी गिते यांच्या राज्यस्तरीय खडतर पाठपुराव्याला यश



**मुंबई/प्रतिनिधी:** अनुसुचित जाती/जमाती(अ.प्र.) अधिनियम,१९८९,सुधारीत अधिनियम,२०१५ अंतर्गत दाखल प्रकरणे चालविण्या करीता अहमदनगर,परभणी,सोलापूर,नांदेड व यवतमाळ येथील न्यायदान कक्षाची उपलब्धता तसेच प्रलंबित प्रकरणांची संख्या विचारात घेऊन त्या ठिकाणी प्रत्येकी एक या प्रमाणे५अनन्य विशेष न्यायालये(एलश्रीीळींश डशिलळरश्र र्उेीींी)स्थापन करण्या बाबत आणि त्याकरिता आवशयक पदांना व खर्चास मान्यता देण्या बाबत महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या दिनांक६ ऑगस्ट२०२६च्या शासन निर्णयान्वये राज्यात जिल्हा न्यायाधीश,दिवाणी न्यायाधीश(वरिष्ठ स्तर),प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी व दिवाणी न्यायाधीश(कनिष्ठ स्तर)या संवर्गातील न्यायिक अधिकाऱ्यांची अतिरिक्त नवीन २८६३नियमित पदे,तसेच त्यांचेसाठी सहाय्यभूत कर्मचारीवृदांची११०६४ नियमित पदे निर्माण करण्यास व ५८०३मनुष्यबळाच्या मर्यादेत बाह्ययंत्रणे द्वारे सेवा घेण्यास संबंधित न्यायालय सुरु होण्याच्या दिनांकापासून घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्या नुसार ट्रॉसिटीनुसार दाखल प्रकरणे चालविण्याकरीता अहिल्यानगर (अहमदनगर) परभणी, सोलापूर, नांदेड व यवतमाळ येथे प्रत्येकी एक याप्रमाणे५अनन्य विशेष न्यायालय (एलश्रीीळींश डशिलळरश्र र्उेीींी)स्थापन करण्याची व त्यासाठी पदनिर्मिती करून मान्यता देण्यात आली आहे. येणाऱ्या खर्चास रुपये ३.९९.३५.५२०/ (रुपये तीन कोटी नव्याण्णव लक्ष पस्तीस हजार पाचशे वीस फक्त)इतक्या वार्षिक आवर्ती व रु. ५१,६८,५००/(रुपये एकावन्न लक्ष अडुसष्ट हजार पाचशे फक्त) इतका खर्च या प्रमाणे एकूण रु.४,५१,०४,०२०/- (रुपये चार कोटी एकावन्न लक्ष चार हजार वीस फक्त) इतक्या रकमेच्या खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने तसेच मा.मंत्रिमंडळाच्या दि.२८.०७.२०२६ रोजीच्या बैठकीत झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित केला आहे. नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टीस एन डी एम जे संघटनेचे राज्य सचिव वैभव जी गीते यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की,विधी व न्याय विभागाने१० जून१९९४रोजी च्या अधिसूचनेद्वारे राज्यातील सर्व जिल्हा व सत्र न्यायालयांना विशेष न्यायालय म्हणून विनिर्दिष्ट केलेले आहे. व८ नोव्हेंबर२००७रोजी राज्यातील सर्व अतिरिक्त सरकारी वकिलांना विशेष सरकारी वकील म्हणून विनिर्दिष्ट केलेले आहे.

यापूर्वी देखील मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तरीय उच्चाधिकार दक्षता व नियंत्रण समिती च्या३०सप्टेंबर२०१० व ७ फेब्रुवारी २०११च्या बैठकीमध्ये मुख्यमंत्र्यांच्या निर्देशा नुसार सहा विभागात अनन्य विशेष न्यायालय स्थापन करण्यासाठी प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी पाठवण्याचे निर्देश दिले होते. ५ऑक्टोबर २०११ रोजीचा मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता मिळाल्याने महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागाने दिनांक१७ नोव्हेंबर२०११रोजी सहा अनन्य विशेष न्यायालय स्थापन करण्याचा शासन निर्णय जारी केला होता.परंतु या विशेष न्यायालयांकडे ट्रॉसिटी क्टच्या खटल्यान सोबत भा.द.वी व इतर कलमाने दाखल होणारे खटले देखील चालवण्याकरिता दिल्या मुळे विशेष न्यायालयांना ट्रॉसिटी चे खटले जलदगतीने निकाली काढण्यात अपयश आले.हा आपल्या राज्य सरकारचा आज पर्यंतचा इतिहास आहे.

तसेच २०११ च्या जनगणने नुसार महाराष्ट्रात १३२.८ लाख अनुसूचित जाती (ील) आणि१०५.१लाख अनुसूचित जमाती लोकसंख्या आहे. २०१३ मधील गुन्हेगारीचा दर अनुसूचित जातीसाठी २२.८ तर अनुसूचित जमाती साठी ७.४ आहे. महाराष्ट्रात जानेवारी २०१९ ते डिसेंबर २०२३ एकूण नोंदवलेले गुन्हे १६,३५४ आहेत.अनुसूचित जातींवर गुन्ह्यात वाढ २०१९ मध्ये २,१५० व २०२३ मध्ये ३,०२४ पर्यन्त म्हणजे +४०.६ टक्के वाढ झाली.अनुसूचित जमातीमध्ये २०१९ मध्ये ५५९ गुन्हे होते २०२३ मध्ये ७७३ पर्यंत वाढ झाली.+३८.३टक्के वाढ झाली असून दोषसिद्धी दर ८.९% एवढा म्हणजे अत्यंत कमी आहे. दोष सिद्धी वाढविण्यासाठी व प्रलंबित गुन्हे त्वरीत निकाली काढण्यासाठी अनन्य विशेष न्यायालयांच्या सोबतच सरकारची इच्छाशक्ती देखील महत्त्वाची आहे. आम्ही मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सह्याद्री मलबार हिल गेस्ट हाऊस मुंबई व ऐतिहासिक महाड चवदार तळे येथे शिष्टमंडळा सह भेटून १२मागण्यांचे निवेदन देऊन प्रत्येक जिल्ह्यात अनन्य विशेष न्यायालय स्थापन करण्याची मागणी केली होती. त्याची दखल घेऊन मुख्यमंत्र्यांनी राज्यस्तरीय उच्चाधिकार दक्षता व नियंत्रण समितीच्या बैठकीमध्ये अनन्य विशेष न्यायालय स्थापन करण्याचे निर्देश दिले होते. असे वैभवजी गिते यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले.

*पाच अनन्य विशेष न्यायालय स्थापन करण्याच्या शासन निर्णयाचे स्वागत करतो. कायद्याच्या उद्देशाप्रमाणे कामकाज झाल्यास नक्कीच प्रलंबित खटले जलदगतीने निकाली निघतील

**ॲड.डॉ.केवलजी उके**
**राज्य महासचिव नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टिस**

*फक्त पाच जिल्ह्यात अनन्य विशेष न्यायालय स्थापन करून उपयोग नाही.तर प्रत्येक जिल्ह्यात अनन्य विशेष न्यायालय स्थापन करून दोन महिन्यांच्या आतमध्ये खटले निकाली काढावे लागतील तरच राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील पीडित कुटुंबांना जलदगतीने न्याय मिळेल.

**वैभव गिते,**
**राज्य सचिव नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टिस**

ॲट्रॉसिटी क्ट चा कायदा १९८९ ला येऊन ३७ वर्ष झाल्यानंतर ३६ जिल्ह्यांपैकी फक्त पाच जिल्ह्यांमध्ये अनन्य विशेष न्यायालय स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असून ३६ वर्षात सरकार कडूनच बौद्ध,दलित-आदिवासीं बद्दल हेतुपुरस्सर भेदभाव झाल्याचे दिसून येत आहे.

**पंचशिलाताई कुंभारकर,राज्य संघटक नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टीस महाराष्ट्र**

## उमरी येथे 'तिर्रट'जुगारावर केज पोलिसांचा छापा

### १ लाख २८ हजार २०० रुपयाचा मुद्देमाल केला जप्त




**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील उमरी येथे 'तिर्रट' जुगारावर केज पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली असुन या कार्यवाई मध्ये १ लाख २८ हजार २०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक १० ऑगस्ट २०२६ रोजी केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांना एका गुप्त खबऱ्यामार्फत माहिती मिळाली की, केज तालुक्यातील उमरी येथील ओमकार किरणा नावाच्या पत्र्याचे शेडमध्ये काही इसम हे हार जीत व तिर्रट नावाचा जुगार पत्त्याच्या पानावर पैसे लावून खेळत आहेत.

अशी माहिती मिळाली असता सदर माहितीची खात्री करून पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या आदेशावरून सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण उंबरे,ग्रेट पोलीस उपनिरीक्षक अमर इनामदार,पोह/बाळासाहेब अहंकारे,पोह/नितीन वारे,पोअं/दादाराव देवगुडे,पोअं/शिवाजी कागदे यांनी उमरी येथील ओमकार किराणा नावाच्या पत्र्याचे शेडमध्ये अचानक जाऊन ३-४५ वाजता छापा मारला असता सदरच्या त्यामध्ये हार जीत तिर्रट नावाचा जुगार पत्त्याच्या पानावर पैसे लावून खेळत असताना अंकुश माणिक जाधव, अविनाश गंगाराम मुळे, प्रदीप दिलीप पवार, ज्ञानोबा गोकुळ भैरट, राजाभाऊ संपत मुळे, नवनाथ तुळशीराम शिंपले सर्व राहणार उमरी ता.केज, बादल विठ्ठल पवार रा. श्यामनगर लातूर, दिनू अभिमन कसबे राहणार उंबरी असे आरोपी मिळून आले. यातील एक आरोपी राजाभाऊ अंगद भैरट हा पोलीस बदकाला पाहून पळून गेला आहे सदर आरोपीच्या ताब्यात रोख रक्कम, मोबाईल फोन, मोटर सायकल असा एकूण १ लाख २८ हजर २०० रुपयाचा मध्यमाल मिळून आल्याने आरोपी विरुद्ध केज पोलीस ठाणे येथे गु.र.नं.५१०/२०२६ कलम २(अ) महाराष्ट्र जुगार कायद्यानुसार आठ आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास सफौ/तुकाराम मुरकुटे हे करीत आहेत. सदरची कामगिरी ही पोलीस निरीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके मॅडम, सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटराम, पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण उंबरे, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक अमेरी इनामदार, पोहे/ बाळासाहेब अहंकारे, नितीन वारे, दादाराव देवगुडे, शिवाजी कागदी यांनी केली आहे.

## अथर्वच्या तिसऱ्या वाढदिवसानिमित्त ३ हजार रोपांची लागवड



डॉ. हनुमंत सौदागर यांच्या संकल्पनेतून अभिनव पर्यावरणपूरक उपक्रम

**केज/प्रतिनिधी :** वाढदिवसाचा आनंद पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकीशी जोडत अथर्व नागेश कराळे यांच्या तिसऱ्या वाढदिवसानिमित्त ग्लोबल परळी यांच्याकडून उपलब्ध झालेली ३ हजार रोपांचे लागवड करण्याचा संकल्प पूर्ण करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते डॉ. हनुमंत सौदागर यांच्या संकल्पनेतून हा अभिनव पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत भावठाणा, सोनवळा, केकत सारणी आणि चंदनसावरगाव येथील शेतकऱ्यांना शेवगा, लिंबोनी, सीताफळ, बोर, चिंच आणि करंज आदी रोपांचे वाटप करण्यात आले. वृक्षांची संख्या वाढवून पर्यावरणीय संतुलन राखणे आणि वाढदिवसाला सामाजिक बांधिलकीची जोड देणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.

वाढदिवसानिमित्त आयोजित मराठी शब्द स्पर्धेत कु. जागृती गुणवंत कदम हिने प्रथम क्रमांक मिळवत १,००१ रुपये, कु. प्रीतम फुलचंद तोंडे हिने द्वितीय क्रमांक मिळवत ७०१ रुपये, तर कु. ऋतुजा रामकिसन घोळवे हिने तृतीय क्रमांक मिळवत ५०१ रुपयांचे रोख पारितोषिक पटकाविले. मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांचा सत्कार करण्यात आला. याच प्रसंगी बापू शिवाजी कापसे यांना मोबाईल भेट देण्यात आला. उपक्रम यशस्वी करण्यासाठी शिवाजी कापसे, सिद्धलिंग कापसे, हरीदास यादव, पप्पू कापसे, शरद गिराम, प्रकाश काळे, सतीश मुळे , मुळे मॅडम, नितीन , बाळासाहेब पोळ, सचिन पतंगे, सौ. रोहिणी कराळे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

जल, जमीन आणि जंगल हे पर्यावरणाचे महत्त्वपूर्ण घटक आहेत. समृद्ध आणि शाश्वत विकासासाठी पर्यावरण संवर्धन आवश्यक असून, त्या दिशेने हा आमचा छोटासा प्रयत्न आहे.

**- डॉ. नागेश कराळे (पर्यावरण मित्र)**

# लोकनेते कै. बाबुरावजी आडसकर यांच्या दहाव्या पुण्यस्मरणानिमित्त आडस येथे भावपूर्ण अभिवादन

### अक्रुर महाराज साखरे यांच्या सुश्राव्य कीर्तनाने परिसर भक्तीमय; विविध क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिकांची मोठी उपस्थिती

**केज/प्रतिनिधी :** लोकनेते तथा माजी आमदार कै. बाबुरावजी आडसकर (तात्या) यांच्या दहाव्या पुण्यस्मरणानिमित्त बुधवार, दिनांक १२ ऑगस्ट २०२६ रोजी केज तालुक्यातील आडस येथील छत्रपती शिवाजी विद्यालयात, विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी कै. बाबुरावजी आडसकर यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन करण्यासाठी व आडसकर कुटुंबावर प्रेम करणार्या नागरिक, कार्यकर्ते यांची अलोट गर्दी पहाण्यास मिळाली. सर्व प्रथम प्रतिमेचे पूजन व पुष्प अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यानंतर ह.भ.प. कीर्तनकेसरी अक्रुर महाराज साखरे यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. त्यांच्या कीर्तनाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. यावेळी कै. बाबुरावजी आडसकर (तात्या) यांच्या राजकीय, शैक्षणिक व सामाजिक कार्याला उजाळा देण्यात आला. सत्तरच्या दशकात आडससारख्या ग्रामीण भागातून पुढे येत आमदारपद भूषवून लोकनेते म्हणून त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला. ग्रामीण भागातील विकास, शिक्षण आणि सामाजिक कार्यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचे यावेळी स्मरण करण्यात आले.

कै. आडसकर यांच्या पुण्यस्मरणानिमित्त अभिवादन करण्यासाठी केज, अंबाजोगाई, धारूर, माजलगाव,परळी,गेवराई, परळी तसेच आडस पंचक्रोशीतील नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी माजी आमदार संजयजी दौंड, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्र्वर आबा चव्हाण, ज्येष्ठ पत्रकार रामभाऊ कुलकर्णी, राजकिशोर पापा मोदी, अंकुशराव इंगळे, हनुमंत काका मोरे, रमाकांत बापू मुंडे, राहुल भैय्या सोनवणे, संतोष दादा हंगे, राजेभाऊ मुंडे, नगराध्यक्षा सिताताई बनसोड, हारूनभाई इनामदार, भाई मोहन गुंड, भगवान केदार, डॉ. वासुदेव नेहरकर, विष्णू घुले, पाशाभाई शेख, ईश्र्वर मुंडे, धैर्यशीलजी देशमुख, माधवराव निर्मळ, धनंजय देशमुख (मस्साजोग), डॉ. इंगोले, डॉ.अंजली घाडगे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, आजी-माजी जि.प., पं. स. व ग्रामपंचायत सदस्य, कार्यकर्ते, व्यापारी, शिक्षण व आध्यात्मिक क्षेत्रातील व्यक्ती, पत्रकार तसेच स्नेही मंडळी उपस्थित होती.

**'तात्यांच्या पुण्याईने रमेशराव आडसकर यांचे कर्तृत्व बहरले'**

यावेळी उपस्थित मान्यवर यांनी कै. बाबुरावजी आडसकर यांच्या कार्याचा गौरव करताना, तात्यांच्या पुण्याईने रमेशराव आडसकर यांचे कर्तृत्व बहरले आहे. भविष्यात सर्वांच्या आशीर्वादाने त्यांना राजकारणात चांगले दिवस येतील, असे सूतोवाच करून आम्ही आडसकर कुटुंबासोबत कायम उभा असल्याचे सांगितले.

**जनहिताच्या कामासाठी सदैव प्रयत्नशील राहणार : रमेशराव आडसकर**

आभार प्रदर्शन करताना रमेशराव आडसकर यांनी कै. बाबुरावजी आडसकर यांच्या दहाव्या पुण्यस्मरणानिमित्त उपस्थित राहून अभिवादन करणाऱ्या सर्वांचे आभार मानले. उपस्थितांचे आशीर्वाद व साथ यामुळे जनहिताचे काम करण्याची प्रेरणा मिळते, असे त्यांनी सांगितले. स्व. तात्या आणि स्व. मेघराज आडसकर यांचे आशीर्वाद, तसेच सर्वांची साथ घेऊन सर्व जाती-धर्माच्या कार्यकर्त्यांना सोबत ठेवत विकासकामांसाठी यापुढेही सदैव प्रयत्नशील राहणार, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.



कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आडसकर कुटुंबातील अर्चना ताई आडसकर, ऋषीभैय्या आडसकर व रंजितदादा आडसकर, शशी भैय्या आडसकर यांनी उत्तम व्यवस्थापन केले. तसेच छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी भोजन व्यवस्थेची जबाबदारी उत्तम प्रकारे सांभाळली.

# आरक्षण उपवर्गीकरणा विरोधात अहमदपूरमध्ये आंबेडकरी जनतेचा ऐतिहासिक एल्गार!

## दहा हजारांहून अधिक आंबेडकरी जनतेचा महामोर्चा; “आरक्षणाचे तुकडे करू नका” असा सरकारला स्पष्ट इशारा





**अहमदपूर/प्रतिनिधी** : अनुसूचित जाती आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या प्रस्तावाविरोधात आज अहमदपूर तालुक्यातील आंबेडकरी जनतेच्या वतीने ऐतिहासिक आणि विराट महामोर्चाचे आयोजन करण्यात आले. अनुसूचित जाती प्रवर्गातील विविध ५९ जातींना सोबत घेत निघालेल्या या महामोर्चाने संपूर्ण अहमदपूर शहर अक्षरशः निळ्या लाटेने व्यापून गेले. हातात निळे ध्वज, गळ्यात पंचरंगी उपरणे आणि ओठांवर आंबेडकरी विचारांच्या घोषणा देत हजारो महिला, युवक, उपासक-उपासिका आणि आंबेडकरी अनुयायी या महामोर्चात सहभागी झाले. राज्य शासनाने बदर समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने अनुसूचित जाती आरक्षणातील वर्गीकरणाबाबत लेखी सूचना व हरकती मागविल्यानंतर राज्यभरातून याविरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर अहमदपूरमध्ये हा महामोर्चा काढण्यात आला.

नगरपरिषद परिसरातून सुरू झालेला हा महामोर्चा स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, आझाद चौक, भीमनगर, बौद्धनगर मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ पोहोचला. येथे महामोर्चाचे रूपांतर जाहीर सभेत झाले. या जाहीर सभेच्या अध्यक्षस्थानी राजगृहाचे वारसदार तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वंशज ॲड. अमनदादा आनंदराज आंबेडकर उपस्थित होते.

सभेचे प्रास्ताविक विद्रोही कवी सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र कांबळे यांनी करून मोर्चाची भुमिका विषद केली. यावेळी जेष्ठ नेते गोपीनाथराव जोंधळे, सुप्रिय बनसोडे, बाबासाहेब कांबळे, श्रीकांत बनसोडे, साधूभाऊ गायकवाड, युवक नेते डॉ. सिध्दार्थकुमार सूर्यवंशी, रिपब्लिकन सेनेचे महासचिव युवराज धसवाडीकर, सचिन बानाटे, आरपीआय नेते चंद्रकांत चिकटे आदींनी आपल्या भाषणातून आरक्षण उपवर्गीकरणाच्या प्रस्तावाला तीव्र विरोध व्यक्त केला. याप्रसंगी मंचावर पूज्य भंते महाविरो थेरो,भंते पय्यानंद भंते महाबोधी,भंते धम्मघोष लातूर यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती.

संघर्षाचे नाव म्हणजे आंबेडकर..!

ॲड. अमनदादा आनंदराज आंबेडकर महामोर्चाला संबोधित करताना युवा नेते ॲड. अमनदादा आनंदराज आंबेडकर यांनी सरकारला स्पष्ट इशारा देताना सांगितले की, “त्या संघर्षाचे नाव म्हणजे आंबेडकर होय. समाजावर अन्याय-अत्याचार होत असताना लढा देण्यासाठी आंबेडकर कुटुंबीय कधीही रस्त्यावर यायला तयार आहेत.

राज्य सरकारने वेळीच आपली भूमिका सुधारून अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाचा विचार डोक्यातून काढून टाकावा, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली. समाजामध्ये फूट पाडून संघर्ष निर्माण करण्याची प्रवृत्ती ही प्रस्थापित व्यवस्थेची जुनी पद्धत असल्याचा आरोप करत ते म्हणाले की, पूर्वी हिंदू-मुस्लिम, त्यानंतर मराठा-ओबीसी आणि आता महार-मांग अशा पद्धतीने समाजामध्ये संघर्ष निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जात आहे. ही व्यवस्था समजून घेऊन समाजाने एकजुटीने उभे राहण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

महिलांचा आणि युवकांचा लक्षणीय सहभाग या महामोर्चाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे महिलांची आणि युवकांची प्रचंड उपस्थिती. तालुक्याच्या ग्रामीण भागासह शहरातील विविध भागांतून मोठ्या संख्येने नागरिक महामोर्चात सहभागी झाले होते.

निळे ध्वज, पंचरंगी उपरणे आणि गगनभेदी घोषणांनी अहमदपूर शहर दुमदुमून गेले होते. महामोर्चात सुमारे दहा हजारांहून अधिक बौद्ध उपासक-उपासिका व आंबेडकरी अनुयायी सहभागी झाल्याचा दावा आयोजकांनी केला. त्यामुळे हा महामोर्चा अहमदपूरच्या सामाजिक इतिहासातील लक्षवेधी आंदोलन ठरला.

आरक्षण उपवर्गीकरण रद्द झालेच पाहिजे, आरक्षणाचे तुकडे करू नका, जय भीम अशा घोषणांनी संपूर्ण शहराचा परिसर दुमदुमून गेला. अहमदपूरमधून राज्य सरकारला स्पष्ट संदेश अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा निर्णय हा केवळ प्रशासकीय विषय नसून तो अनुसूचित जातींच्या सामाजिक एकजुटीशी आणि प्रतिनिधित्वाच्या प्रश्नाशी जोडलेला आहे, अशी भावना महामोर्चातील सहभागी जनतेने व्यक्त केली.

“वाटणी नको, एकजूट हवी; आरक्षणात उपवर्गीकरण नको!” असा स्पष्ट संदेश देत अहमदपूरच्या आंबेडकरी जनतेने आज आपल्या एकजुटीचे दर्शन घडविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पद्माकर कांबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन भगवानराव ससाने यांनी केले.

महामोर्चाच्या यशस्वी आयोजनासाठी अनुसूचित जाती वर्गीकरण विरोधी कृती समितीच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले.

अहमदपूरच्या या विराट एल्गाराने अनुसूचित जाती आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या प्रश्नावर आता संघर्ष अधिक तीव्र होण्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत.

या मोर्चाच्या यशस्वीतेसाठी नगरसेविका तनुजाताई सूर्यवंशी, सावन कदम, मुन्ना कांबळे, उत्तमराव कांबळे, लक्ष्मीकांत बनसोडे, सूजीत गायकवाड, सारीपूत्र ढवळे, एस.एल. जाधव, गोदाम सर, अरूणभाऊ वाघंबर आदींसह असंख्य बांधवांनी पूढाकार घेतला.

## पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांना ‘लातूर भूषण पुरस्कार सोहळ्या’चे निमंत्रण





**लातूर/प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई जिल्हा शाखा लातूरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘लातूर भूषण पुरस्कार सोहळ्या’चे निमंत्रण जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांना देण्यात आले.

हा पुरस्कार सोहळा १७ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा या सोहळ्यात गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांची भेट घेऊन त्यांना सोहळ्याचे निमंत्रण दिले.

यावेळी पत्रकार संघाचे राज्य उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष अशोक देडे, जिल्हा सरचिटणीस अशोक हनवते, जिल्हा संघटक सुधाकर फुले, रेणापूर तालुका अध्यक्ष शरद राठोड तसेच इलेक्ट्रॉनिक प्रमुख हारून मोमीन उपस्थित होते.

‘लातूर भूषण पुरस्कार सोहळा’ यशस्वी करण्यासाठी पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांकडून तयारी सुरू असून, विविध क्षेत्रांतील मान्यवरांची या कार्यक्रमाला उपस्थिती राहणार आहे.

## सेलू (बु.) येथे वर्षावास प्रवचन मालिकेचा उत्साहात शुभारंभ





**लातूर/प्रतिनिधी** : भारतीय बौद्ध महासभा, लातूर तालुका शाखेच्या वतीने विश्र्वशांती बुद्ध विहार, सेलू (बु.), ता. लातूर येथे वर्षावास प्रवचन मालिकेचा उद्घाटन समारंभ रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महिलांच्या हस्ते दीपप्रज्वलन व धूपाने बुद्धवंदना करण्यात आली. त्यानंतर बौद्धाचार्यांच्या मार्गदर्शनाखाली सामूहिक त्रिशरण, पंचशील, बुद्धपूजा, भीमस्मरण व भीमस्तुती घेण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्र्वनाथ कांबळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे बौद्धाचार्य सदानंद कापुरे, बौद्धाचार्य बिभीषण कांबळे भूसनीकर आणि प्रकाश वाले उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे तसेच कार्यक्रमाध्यक्षांचा समाजबांधवांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

वर्षावास प्रवचन मालिकेच्या निमित्ताने बौद्धाचार्य सदानंद कापुरे, बौद्धाचार्य बिभीषण कांबळे भूसनीकर आणि प्रकाश वाले यांनी ‘बौद्ध लेणी, स्तंभलेख व शिलालेख’ या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. भारताच्या प्राचीन बौद्ध वारशाचे महत्त्व, ऐतिहासिक लेणी आणि शिलालेखांच्या माध्यमातून बौद्ध धम्माच्या समृद्ध परंपरेची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली.

यावेळी भारतीय बौद्ध महासभा लातूर तालुका सचिव तथा उपविभागीय दक्षता समिती सदस्य पवन कांबळे सेलूकर, भगवान घोडके, संभाजी कांबळे, बाळू कांबळे, नानासाहेब कांबळे, विश्र्वंभर कांबळे, बालाजी कांबळे, महेश कांबळे, प्रशांत कांबळे, आदेश कांबळे यांच्यासह पार्वती घोडके, मनीषा कांबळे, नंदिनी कांबळे, दिव्या कांबळे, माया कांबळे, अश्र्विनी कांबळे आदी समाजबांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सांगता सामूहिक सरणत्तय गाथेने करण्यात आली. कार्यक्रमाचे आभार पवन कांबळे सेलूकर यांनी मानले.

## व्हीएस पँथर्स ऑटो युनियनच्या वतीने नवीन दरवाढ लागू करण्यासाठी दिले आर टी ओ ना निवेदन

**लातूर/प्रतिनिधी** : येथील व्ही एस पँथर्स ऑटो युनियनच्या वतीने सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांची भेट घेऊन इंधन दरवाढीमुळे ऑटो चालकांना खूप आर्थिक अडचणी निर्माण होत आहेत त्यासाठी लातूर जिल्ह्यातील सर्व ऑटो चालकांसाठी नवीन दरवाढ लागू केली तर ऑटो चालकांना परवडेल यासाठी निवेदन देऊन नवीन दरवाढ लागू करण्याची मागणी करण्यात आली.

या निवेदनावर संपर्क प्रमुख आनंद जाधव, जिल्हाध्यक्ष देवा गायकवाड,जिल्हाउपाध्यक्ष विलास कसबे, शहराध्यक्ष जगदीश सरवदे,बंटी बनसोडे, समाधान ढोबळे, ,विशाल घनगावकर, युनुस शेख ,बालाजी सोनवणे, बापू सरवदे आदीच्या स्वाक्षरी आहेत




# दंतचिकित्सेत आधुनिक तंत्रज्ञानासोबत सेवाभाव आवश्यक

## डॉ. हनुमंत कराड यांचे प्रतिपादन; एमआयडीएसआर दंत महाविद्यालयात राज्यस्तरीय ‘दंतवेदांता २०२६’ परिषद




**लातूर/प्रतिनिधी** : दंतचिकित्सा क्षेत्रात आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधनाला मानवी संवेदनशीलतेची जोड देणे आवश्यक आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान हे उपचार अधिक अचूक आणि प्रभावी करण्याचे साधन आहे; मात्र रुग्णाचा विश्र्वास, करुणा आणि सेवाभाव हे दंतचिकित्सेचे मूलभूत आधार आहेत, असे प्रतिपादन माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांनी केले.

एमआयडीएसआर दंत महाविद्यालय, लातूर येथे आयोजित ‘दंतवेदांता २०२६’ या परिषदेत प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना डॉ. हनुमंत कराड बोलत होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी, संस्थात्मक विकास अधिकारी डॉ. कैलास शेळके, डॉ. ओम बघेले, डॉ. विजयलक्ष्मी माले व डॉ. गौरी उगले यांची प्रमुख उपस्थिती होती.

‘विज्ञान आणि अध्यात्माच्या साहाय्याने हास्यात सुसंवाद साधणे’ (Harmonizing Smiles With Science Spirituality) या बोधवाक्याखाली आयोजित करण्यात आलेल्या या दुसऱ्या राज्यस्तरीय परिषदेत राज्यातील विविध भागांतून दंतचिकित्सक, प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थी सहभागी झाले.

यावेळी बोलताना डॉ. कराड म्हणाले, विज्ञान आपल्याला काय करायचे आणि कसे करायचे हे शिकवते; तर अध्यात्म आपण हे का करीत आहोत, याची जाणीव करून देते. ज्ञानाला करुणेची जोड मिळाली तरच आरोग्य सेवा खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण ठरते. दंतचिकित्सकांनी केवळ रुग्णाच्या दातांवर उपचार न करता त्याची भीती, चिंता आणि मानसिकता समजून घेत संवेदनशीलतेने उपचार करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

आधुनिक काळात डिजिटल दंतचिकित्सा, कृत्रिम बुद्धिमत्ता, अत्याधुनिक निदान पद्धती, इम्प्लांटोलॉजी तसेच विविध आधुनिक तंत्रज्ञानामुळे दंतचिकित्सा क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहेत. या बदलांचा स्वीकार करताना दंतचिकित्सकांनी सातत्याने नवे ज्ञान आणि कौशल्य आत्मसात करावे, असे आवाहन डॉ. कराड यांनी केले.

दंतआरोग्याबाबत जनजागृती आणि प्रतिबंधात्मक दंतचिकित्सेवर भर देण्याची गरज व्यक्त करताना डॉ. कराड यांनी ग्रामीण तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत दंतआरोग्य सेवा पोहोचविण्याचे आवाहन केले. उपचार करण्यापेक्षा आजार होऊ न देणे अधिक महत्त्वाचे आहे. प्रत्येक दंतचिकित्सकाने आपल्या क्लिनिकच्या पलीकडे जाऊन समाजाच्या दंतआरोग्यासाठी योगदान दिले पाहिजे, असे ते म्हणाले.

प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांमधून पुस्तकी ज्ञानाचे रूपांतर प्रत्यक्ष कौशल्यात होते. तज्ज्ञांचे मार्गदर्शन ऐकून त्यावर विचार करणे, प्रश्न विचारणे, सहकाऱ्यांशी चर्चा करणे आणि प्रत्यक्ष प्रयत्नांतून शिकणे आवश्यक आहे. ‘ऐका आणि विचार करा’ हा मूलमंत्र विद्यार्थ्यांनी आत्मसात करावा, असेही डॉ. कराड यांनी सांगितले.

दंतचिकित्सेतील आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करताना विद्यार्थ्यांनी सुरुवातीपासूनच लूप्स, मायक्रोस्कोप आणि आधुनिक साधनांचा वापर करण्याची सवय लावून घ्यावी. यामुळे उपचारातील अचूकता आणि कौशल्य वाढण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले. सुंदर हास्य निर्माण करणे ही दंतचिकित्सकाची कला आहे; मात्र त्या हास्यामागे आत्मविश्वास निर्माण करणे ही त्याची खरी सेवा आहे, असा संदेश देत त्यांनी युवा दंतचिकित्सकांना संशोधन, नवकल्पना, आधुनिक तंत्रज्ञान आणि सामाजिक बांधिलकी यांचा समन्वय साधण्याचे आवाहन केले.

दंतचिकित्सेच्या विविध विषयांवर भविष्यातही अशा परिषदांचे सातत्याने आयोजन व्हावे आणि विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञान व ज्ञानाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ‘ढेसशींहशी थश उरप’ या भावनेतून एकत्रित प्रयत्न केल्यास जागतिक दर्जाचे दंतचिकित्सक घडविता येतील, असा विश्वासही डॉ. कराड यांनी व्यक्त केला. यावेळी बोलताना संस्थात्मक विकास अधिकारी डॉ. कैलास शेळके यांनी दंतचिकित्सा क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापराचे महत्त्व अधोरेखित केले. निदानातील अचूकता आणि उपचारांमधील सुस्पष्टता वाढविण्यासाठी तंत्रज्ञान महत्त्वपूर्ण ठरत असून, भविष्यात स्टेम सेल्स, रीजनेरेटिव्ह डेंटिस्ट्री आणि प्रिव्हेंटिव्ह डेंटिस्ट्री या क्षेत्रांमध्ये संशोधनाला मोठी संधी आहे, असे त्यांनी सांगितले. ‘इम्प्लांटॉलॉजी’नंतर आता ‘व्हॉट नेक्स्ट?’ या प्रश्र्नाचा शोध घेत पुढील पिढीतील दंतचिकित्सकांनी नव्या संशोधन क्षेत्रात पुढाकार घ्यावा, असे आवाहन डॉ. शेळके यांनी केले.

प्रारंभी प्रास्ताविकात डॉ. गौरी उगले यांनी ‘दंतवेदान्त’ उपक्रमामागील संकल्पना स्पष्ट केली. दंतचिकित्सा क्षेत्रातील ज्ञान, उत्कृष्टता आणि सातत्यपूर्ण प्रगतीचे प्रतीक म्हणून गेल्या दोन वर्षांपासून हा उपक्रम राबविला जात असून, यंदा ‘इम्प्लांट’ या विषयावर परिषद आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. राज्याच्या विविध भागांतून तसेच बीदर येथून सहभागी झालेल्या प्रतिनिधींचे स्वागत करत, या व्यासपीठाच्या माध्यमातून दंतचिकित्सा क्षेत्रातील ज्ञानाची देवाणघेवाण आणि नवनवीन तंत्रज्ञानाची ओळख होऊन परिषद सर्वांसाठी संस्मरणीय ठरेल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बीडीएस अंतिम वर्षातील विद्यार्थिनी सृष्टी पाटील व विष्णुप्रिया मालू यांनी केले, तर डॉ. तृप्ती गिरी यांनी आभार मानले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.